जा.क्र.का.15/कलम 31,32,33/परिपत्रक/ 945
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,
पुणे-411001, दि.09/9/2015

**परिपत्रक :-**

**विषय** :- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम 31, 32अ, 33 व 33अ खालील प्राप्त दस्तांचे मूल्यांकनासाठी करावयाचे कार्यवाहीबाबत.

**संदर्भ** :- विभागाचे परिपत्रक क्र.कार्या-15/कलम 31,32,33/1023, दि.31/12/2014.

संदर्भित परिपत्रकान्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम 31,32अ, 33 व 33अ खाली प्राप्त दस्तांचे मूल्यांकनासाठी सक्षम अधिकारी यांची पूर्वमान्यता घेणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मिळकतीचे स्वरुप, वाढत्या किंमती यांचा विचार करुन, तफावतीच्या अनुषंगाने वरिष्ठ स्तरावर पडताळणी व्हावी व पक्षकारांना त्यानंतर पुन्हा पुनर्विलोकन, अपील इ. प्रश्नांना सामोरे जावे लागण्याची शक्यता कमी करण्यासाठी त्या सूचनामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहेत.

| **मिळकतीचे गुण-दोषानुसार वजावट / घट देऊन मूल्यांकन निश्चित करण्याबाबतचे अधिकारक्षेत्र / मर्यादा** | **अभिनिर्णय / चुकविलेले मुद्रांक शुल्क प्रकरणासंबंधी मूल्यांकनास पूर्व मान्यता देण्याबाबतचे सक्षम अधिकारी** | **स्तंभ क्र.2 मधील अधिकाऱ्यांनी प्रकरण निपटारा करण्याची कालमर्यादा** |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर व सूचनानुसार मिळकतीचे निश्चित होणारे मूल्य आणि सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मिळकतीचे गुण, दोष इ.बाबी विचारात घेऊन आलेले मूल्य यामध्ये 10% पेक्षा अधिक परंतु 20% पर्यंत फरक असल्यास अथवा रु.2.50 कोटी पेक्षा अधिक परंतु रु.5 कोटीपर्यंत फरक असल्यास आणि अभिनिर्णय प्रकरणी वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरास व येणा-या मूल्यास उपरोक्त मर्यादेपर्यंत वजावट / घट देणे आवश्यक आहे असे मत असल्यास, सर्व कागदपत्रे / मूल्यांकन अहवाल इ.चा अभ्यास करुन अभिनिर्णय प्रकरणामध्ये पूर्व मान्यता घेऊन संबंधित सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अंतिम आदेश पारित करणे आवश्यक राहील. | संबंधित विभागातील विभागीय मूल्यांकन अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन मुंबई बाबतीत उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई | प्रकरण प्राप्त दिनांकापासून 15 दिवसाचे आत. |
| वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर व सूचनानुसार मिळकतीचे निश्चित होणारे मूल्य आणि सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मिळकतीचे गुण, दोष इ.बाबी विचारात घेऊन आलेले मूल्य यामध्ये 20% पेक्षा अधिक | सहसंचालक, नगर रचना मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे | प्रकरण प्राप्त दिनांकापासून 15 दिवसाचे आत. |

| | | |
|---|---|---|
| परंतु 30% पर्यंत फरक असल्यास अथवा रु.5 कोटीपेक्षा अधिक परंतु रु.10 कोटीपर्यंत फरक असल्यास आणि अभिनिर्णय प्रकरणी वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरास व येणा-या मूल्यास उपरोक्त मर्यादेपर्यंत वजावट / घट देणे आवश्यक आहे असे मत असल्यास, सर्व कागदपत्रे / मूल्यांकन अहवाल इ. सह प्रकरण, थेट सहसंचालक, नगर रचना (मूल्यांकन), पुणे यांना सादर करुन त्यांची पूर्वमान्यता घेऊन, संबंधित सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अंतिम आदेश पारित करणे आवश्यक राहील. | | |
| वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर व सूचनानुसार मिळकतीचे निश्चित होणारे मूल्य आणि सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मिळकतीचे गुण, दोष इ. बाबी विचारात घेऊन आलेले मूल्य यामध्ये 30% पेक्षा अधिक फरक असल्यास अथवा रु.10 कोटीपेक्षा अधिक फरक असल्यास आणि अभिनिर्णय प्रकरणात वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरास व येणा-या मूल्यास उपरोक्त मर्यादेपर्यंत वजावट / घट देणे आवश्यक आहे असे मत असल्यास, सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, पुणे यांचेकडे थेट सविस्तर मूल्यांकन अहवाल व आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रकरण सादर करण्यात यावे व अशा प्रकरणात सहसंचालकांनी मा.नोंदणी महानिरीक्षक यांची मान्यता घेऊन, संबंधित सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांना पूर्वमान्यता कळविल्यानंतर, अंतिम आदेश पारित करणे आवश्यक राहील. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे | प्रकरण प्राप्त दिनांकापासून 15 दिवसाचे आत. |

संदर्भित परिपत्रकातील उर्वरित सूचना कायम राहतील.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर publications या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
10) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

8/7

O/C

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता